# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१

e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in


पत्र क्रमांक नाविम./पमा./818
दिनांक :– 04/03/2025

<u>परीक्षा प्राधान्य/कालमर्यादित व अत्यंत महत्वाचे</u>

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये.
नागपूर विभाग, नागपूर.
जिल्हा :– (भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया.)

**विषय:–** **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) फेब्रुवारी/मार्च–2025 Out of Turn परीक्षांचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबत....**

संदर्भ:– 1) राज्य मंडळ पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा–2/425, दि. 30/01/2025.
2) राज्य मंडळ पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा–2/907, दि. 04/03/2025.

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षा फेब्रुवारी/मार्च–2025 अंतर्गत दिनांक 12/03/2025, 15/03/2025 व 17/03/2025 या कालावधीमध्ये इयत्ता 12 वी व दिनांक 18/03/2025 ते 20/03/2025 या कालावधीमध्ये इयत्ता 10 वी च्या प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन **Out of Turn** परीक्षांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर विद्यार्थ्यांचे गुण नोंदविण्याकरीता मंडळाचे संकेतस्थळ **www.mahahsscboard.in** वर **Out of Turn mark** ची लिंक **Out of Turn** परीक्षा कालावधीमध्ये सुरू राहील. त्याव्दारे सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये व माध्यमिक शाळा यांनी **Out of Turn** परीक्षा देणा–या विद्यार्थ्यांचे गुण ऑनलाईन पध्दतीने नोंदवावयाचे आहेत. तसेच त्यामध्ये **Absent** दर्शविलेल्या विद्यार्थ्यांची खातरजमा करून अंतिम गुणतक्ते व लागू होणारे शुल्क चलनाने, ऑनलाईन अथवा रोखीने इयत्ता 12 वी साठी दिनांक 20/03/2025 रोजी व इयत्ता 10 वी साठी दिनांक 24/03/2025 रोजी या मंडळ कार्यालयात जमा करावयाचे आहेत.

तरी कोणताही पात्र विद्यार्थी प्रात्यक्षिक गुणापासून वंचित राहणार नाही याची सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर.

प्रत माहिती तथा योग्य कार्यवाहीस्तव :--

1) सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–4 यांना माहितीस्वत समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, ही बाब आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक यांच्या लेखी निदर्शनास अणून दयावे.